# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### **मराठी विभाग**

लोकमत पुणे, रविवार, दि. ४ नोव्हेंबर २०१८

# दिवाळी अंक हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** वाचनसंस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्याचे काम दिवाळी अंक प्रभावीपणे करीत असून ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित दिवाळी अंक भेट कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. टी. जी. गिते, प्रा. ए. जी. कुलकर्णी, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा.गणेश घुमाळ उपस्थित होते. डॉ. संजय शिंदे यांनी मराठी विभागांतर्गत डॉ. ए. पी. जे. अब्दुल वाचन कट्ट्याच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी यासाठी निबंध, वादविवाद, काव्यगायन, पुस्तक परिक्षण आदि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दिवाळी अंक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे भूषण असून दिवाळी फराळाबरोबरच या अंकांमधील साहित्य संस्कृतीची परंपरा आपण जोपासायला हवी, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात दिवाळी अंक भेट कार्यक्रमात सहभागी शिक्षक व विद्यार्थी.

◆ डॉ. एस.बी.पाटील पुढे म्हणाले की, वाचन हा माणसाच्या बौद्धिक विकासाचा पाया असून वाचनामुळे विचारसंपन्न व प्रगल्भ समाज निर्माण होत असतो. वाचनातून माणसाला ज्ञान व आनंद मिळतो. त्यामुळे दीपावलीच्या काळात प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांच्या माध्यमातून वाचनाची संस्कारक्षम परंपरा जतन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे ते म्हणाले.

पुढारी | पुणे, सोमवार
५ नोव्हेंबर २०१८

# दिवाळी अंक हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव : डॉ. पाटील

राजगुरुनगर : प्रतिनिधी

वाचनसंस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्याचे काम दिवाळी अंक प्रभावीपणे करीत असून, ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव असल्याचे मत प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी व्यक्त केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागातर्फे आयोजित दिवाळी अंक भेट कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. टी. जी. गिते, प्रा. र. जी. कुलकर्णी, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. गणेश धुमाळ उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले की, वाचन हा माणसाच्या बौद्धिक विकासाचा पाया असून, वाचनामुळे विचारसंपन्न व प्रगल्भ समाज निर्माण होत असतो. वाचनातून माणसाला ज्ञान व आनंद मिळतो. त्यामुळे दीपावलीच्या काळात प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांच्या माध्यमातून वाचनाची संस्कारक्षम परंपरा जतन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे ते म्हणाले.

डॉ. संजय शिंदे यांनी मराठी विभागांतर्गत डॉ. ए. पी. जे. अब्दुल वाचन कट्ट्याच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी यासाठी निबंध, वादविवाद, काव्यगायन, पुस्तक परीक्षण आदि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून दरवर्षी यात सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा दिवाळी अंक भेट दिला जातो असे सांगितले. दिवाळी अंक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे भूषण असून, दिवाळी फराळाबरोबरच या अंकांमधील साहित्य संस्कृतीची परंपरा आपण जोपासायला हवी, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या वेळी विद्यार्थी व प्राध्यापकांना दिवाळी अंक भेट देण्यात आला व त्यावर विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया नोंदवावी असे मराठी विभागाच्या वतीने आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी; तर आभार डॉ. बी. डी. अनुसे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख